उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
यांच्या संयुक्त विद्यामाने

एस. एस. व्ही. पी. संस्थेचे

## भाऊसाहेब ना. स. पाटील कला आणि
## एम. एफ. एम. ए. वाणिज्य महाविद्यालय, धुळे.

एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद

# उदात्तीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाचा भारतीय व्यवस्थेवर होणारा परिणाम : एक मूल्यमापन

(आंतरविद्याशाखीय)

## दिनांक : २१ जानेवारी २०१७

## मराठी भाग - २

संपादक
डॉ. मनोहर टी. पाटील

अजिंठा प्रकाशन

Scanned by CamScanner

# मराठी अनुक्रमाणिका भाग - २



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | जागतिकीकरण आणि भारतीय शेती<br>प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव | ५८-५९ |
| १६ | जागतिकीकरणातील संयुक्त राष्ट्रसंघटनेपूढील आव्हाने<br>Ramesh Isarya Raut | ६०-६४ |
| १७ | एल. पी. जी. च्या प्रभावाने नागपूर मिहान प्रकल्पाला दिशा<br>प्रा. रमेश काशीराम शेंडे | ६५-७३ |
| १८ | महिला सबलीकरण<br>प्रा. शहाणे रंजना प्रल्हादराव | ७४-७६ |
| १९ | जागतिकीकरण आणि आदिवासी जमात<br>प्रा. डॉ. डी. ए. मानेराव<br>राजेशखन्ना पांडुरंग रंगारी | ७७-८१ |
| २० | जागतिकीकरणाचा कमकुवत घटकावरील प्रभावाचा अभ्यास<br>प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव | ८२-८६ |
| २१ | उदारीकरणाचा साहित्यावर पडलेला प्रभाव<br>प्रा. डॉ. रेखा नारायण वाघ | ८७-९१ |
| २२ | महाराष्ट्रातील जल व्यवस्थापन: सद्यस्थिती आणि उपाय<br>प्रा. डॉ. एस. एस. देवनाळकर | ९२-९५ |
| २३ | जागतिकीकरण आणि भारत<br>डॉ. संभाजी पाटील<br>प्राचार्य डॉ. मनोहर तुकाराम पाटील | ९६-९९ |
| २४ | महिला सक्षमीकरण : वास्तव आणि समस्या<br>प्रा. सय्यद समिना नबीसाब | १००-१०३ |
| २५ | अंबड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाल्यांवर जागतिकीकरणामुळे होणाऱ्या शैक्षणिक परिणामांचा अभ्यास<br>खरात संदिप दगडूजी<br>डॉ. यु. पी. भडंगे | १०४-१०७ |
| २६ | जागतिकीकरणात आदिवासी साहित्याचे मूल्य<br>प्रा. सूर्यवंशी संगीता | १०८-११३ |
| २७ | जागतिकीकरण आणि भारतीय शेतीची उत्पादकता<br>प्रा. डॉ. मगर संजय काशीनाथ | ११४-११७ |





Scanned by CamScanner

अ त्र - २०१७
A SSN - 2277-5730 - IMPACT FACTOR - 3.378 (www.sjifactor.com) 

# जागतिकीकरणाचा कमकुवत घटकावरील प्रभावाचा अभ्यास

**प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव**
विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग, देगलूर महाविद्यालय, ता. देगलूर जि. नांदेड.

वर्तमानकाळात जागतिकीकरण ही एक अनिवार्य प्रक्रिया बनली आहे. त्याने मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला प्रभावित केले. जागतिकीकरणाने परस्परावलंबित्वाच्या प्रक्रियेस वाढवले. तसेच सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तनाच्या एका नव्या युगाचा प्रारंभ केला. जागतिकीकरण उदारीकरणाचा परिणाम आहे. माहिती तंत्रज्ञानाची क्रांती, व्यावसायिक बदल, अर्थजगत, लोकजीवन व संस्कृतीच्या संदर्भाने वाढत्या आंतरसंबंधाचे परिणाम म्हणून पाहता येते. संपूर्ण जगाला खेडे बनवणे व जागतिक भांडवलवादाला मदत करणे हा जागतिकीकरणाचा प्रमुख उद्देश आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने विकासाचा एकच नमुना जगातील सर्वच लहान-मोठे, श्रीमंत-गरीब राष्ट्रावर लादला. त्यामुळे सर्वच प्रकारचे लोक व समाजास या प्रक्रियेसोबत जुळवून घेणे अवघड जात आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेकडे नजर टाकता हे जाणवते की, या प्रक्रियेत सर्वच घटकांना समान फायदा होत नाही. जागतिकीकरणाच्या संरचना व प्रक्रियेला आंतरराष्ट्रीय भांडवलवाद, बाजाराभिमूख शक्तीचे वाढते महत्व, जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्वरुपास निश्चित करणे आणि द्विपक्षीय संबंधाना प्रभावित करणारी यंत्रणा व व्यवस्थेच्या रुपात मांडले जाते. जागतिकीकरण हा एक जागतिक चर्चेचा विषय आहे. त्यास सकारात्मक व नकारात्मक दोन्ही बाजू आहेत. तसेच समर्थक व विरोधक आहेत.राजकीय अभ्यासक व अर्थशास्त्रज्ञ यांच्यातील जागतिकीकरण हा विषय व्यापक चर्चेचा प्रश्न आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने प्रथमतः सर्व देशांच्या अर्थव्यवस्थेला प्रभावित केले. तद्नंतर राजकीय-आर्थिक जीवनासोबत सामाजिक-सांस्कृतिक जीवनाला प्रभावित केले. समाजातील सर्व वर्ग आणि समूहावर त्याचा व्यापक प्रभाव पडला.

वर्तमानात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला समजुन घेतल्याशिवाय इतर कोणत्याही विषयाला समजून घेता येत नाही. त्यामुळे प्रस्तुत लेखात जागतिकीकरणाचा अर्थ समजून घेवून त्याच्या परिणामाचा विचार केला. जागतिकीकरणाने सर्वच घटकाला प्रभावित केले हे सत्य आहे. परंतू सर्वांत अधिक कमकुवत शोषित, मागास, अविकसित घटकांना अधिक प्रभावित केले. त्यामुळे या लेखात जागतिकीकरणाचा कमकुवत घटकावरील प्रभावाचा अभ्यास व विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**जागतिकीकरणाचा अर्थ**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने संपूर्ण जगातील देशांच्या लोकांना चारही बाजूने प्रभावित केले. प्रारंभी जागतिकीकरणाची मांडणी अर्थशास्त्रीय अंगाने केली जात असत. तद्नंतर यात आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार, माहिती तंत्रज्ञान, आर्थिक सहकार्य व समन्वय, बहुराष्ट्रीय कंपन्या, वैज्ञानिक व तांत्रिक सहकार्य, सांस्कृतिक सहकार्य व स्थानांतरण, शरणार्थी समस्या श्रीमंत व गरीब जनता आणि देशातील संबंधाना सहभागी केले. यावरुन हे स्पष्ट होते की, जागतिकीकरणाचे मुख्य अंग आर्थिक आहे. जागतिकीकरणाचा आशय आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रक्रियांच्या सहमिलनाशी आहे. ज्याच्या साह्याने विश्व अधिकाधिक जवळ, संबंधित व आत्मनिर्भर बनेल.

अतिवादी दृष्टिकोणाच्या समर्थकांनी जागतिकीकरणास गरजेचे मानले. त्यांच्यामते जलद विकास व परिवर्तनासाठी हे आवश्यक आहे. याचा मानवी जीवनाच्या प्रत्येक घटकावर अधिक प्रभाव पडला. जागतिकीकरणाच्या माध्यमातून जगातील देशांना संघटित करता येते. भौगोलिक सीमा नसलेल्या जगाची कल्पना यात निहित आहे. वाढते आर्थिक घडामोडी, गुंतवणुक, संगणक, माहिती क्रांती व जागतिक भांडवलाचा वाढता वेग इत्यादींमुळे जग राजकीय, आर्थिक व सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या एकीकृत होत आहे. एका नव्या वैश्विक युगाचे प्रतिपादन ही संकल्पना करते. यामुळे राज्याची स्वायत्तता कमी झाली. बाजाराभिमुख शक्ती व अराज्यीय घटकांचे महत्व वाढले. जागतिकीकरणाचा परिवर्तनवादी दृष्टिकोणाच्या मते, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे होणाऱ्या मुलभूत परिवर्तनाचे मुळ प्राचीनकाळात आहे. त्यांनी अनेक देशातील विविध सामाजिक



Scanned by CamScanner

परंपरा व संस्कृतिचे महत्व स्विकारले. त्यांना टिकवून ठेवण्यावर अधिक भर दिला. जागतिकीकरणामुळे अनेक देशात विविध बदल होत आहेत. विकासाचे नवे-नवे क्षेत्र विकसित झाले. जागतिकीकरण कोणत्याही देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व सांस्कृतिक व्यवस्थेच्या परिवर्तनाची चर्चा करते. तसेच या व्यवस्थेतील मुल्य, परंपरा व रिती-रिवाजांचा सन्मान करतो.

जागतिकीकरणाच्या व्यवस्थेने जगातील सर्वच घटकांना प्रभावित केले. तसेच सर्वांना विकासाचा एक नवा मार्ग उपलब्ध करुन दिला. परंतू हा विकासाचा मार्ग धनवान, बुध्दिवान व शक्तिवानासाठीच उपयुक्त असल्याचे जाणवते. त्यामुळे या व्यवस्थेचा कमकुवत घटकांवर काय परिणाम होत आहे ? त्याबाबतची चर्चा या लेखात खालीलप्रमाणे करण्यात आली.

## जागतिकीकरणाचा महिलांवरील प्रभाव

जागतिकीकरण ही एक विस्तारित प्रक्रिया आहे. तिच्या विस्ताराने समाजातील प्रत्येक घटक प्रभावित झाला. त्यापासून महिलाही दुर्लक्षित नाहीत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा विस्ताराने समाजातील संस्थात्मक आणि संरचनात्मक विकासाला गती आली. तसेच नव-नव्या शक्तींचा उदय वर्तमान बाजारात झाला. जागतिकीकरणात फक्त तीव्र गतीने होणाऱ्या औद्योगिक व आर्थिक विकासाच्या चर्चेसह संपूर्ण समाजातील क्रियाकलापाची पण चर्चा समाविष्ट आहे. देश व समाजाला प्रगतशील करण्यासाठी जागतिकीकरणात किती सत्यता आहे ते त्याच्या टिकात्मक विश्लेषणातून समजून घेता येते. जागतिकीकरणा अंतर्गत समाजातील त्या वर्गाचा अधिक फायदा झाला जो अधिक योग्य, शिक्षित व सक्षम आहे. याने समाजातील वंचित, शोषित व ग्रस्त लोकांना अधिक फायदा न होता नुकसान अधिक झाले.

जागतिकीकरणाचा महिलांवरील काय प्रभाव झाला याबाबतचा विचार करावा लागेल. कारण महिला या व्यवस्थेतील महत्वाचा व कमकुवत समजला जाणारा भाग आहे. भारतीय समाजात प्राचीन काळापासूनच महिला शोषित, पिडीत, दुःखी व नेहमी ग्रासलेली आहे. आजही स्त्रियांची चळवळ स्त्रियांना, सन्मानाने स्थान मिळवून देण्यासाठी संघर्षरत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने महिलांना प्रगती व विकासासाठी अनेक संधी निर्माण केल्या. मोठ्या प्रमाणात रोजगाराची निर्मिती करुन महिलांची राष्ट्रांच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीत सहभागी बनवण्याचे प्रयत्न होत आहेत. या प्रक्रिये अंतर्गत महिलांना अनुकूल रोजगार निर्माण होत आहेत. जेणेकरुन योग्य व सक्षम महिला देशाच्या आर्थिक विकासात योग्य व सक्रिय योगदान देतील. आर्थिक प्रणालीत पाश्चिमात्य मुल्यांच्या स्विकृतीमुळे कार्यक्षेत्रात पुरुष आणि महिला असा फरक केला जात नाही. त्यांच्या सुरक्षिततेसाठी अनेक प्रयत्न होत आहेत. त्यामुळे महिला भयमुक्त बनल्या. आजची स्त्री अधिक स्वतंत्र व आत्मनिर्भर आहे. विकासाच्या प्रक्रियेत पुरुषांच्या खांद्याला खांदा मिळवून काम करत आहेत. यामुळे त्यांची सामाजिक स्थिती सुधारत आहे. सन्मान व प्रतिष्ठेच्या नजरेने पाहिले जाते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भारतीय महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत अधिक सुधारणा होत आहेत.

भारतात महिलांचा विकास व महिला सबलीकरणासाठी अनेक प्रयत्न झाले परंतू त्याचा नकारात्मक प्रभावही जाणवतो. बहुराष्ट्रीय कंपन्यात महिलांकडे शोभेची वस्तू म्हणून पाहिले जाते. मोठ-मोठ्या कंपन्या आपले व्यावसायिक हितसंबंध पूर्ण करणे व आपल्या वस्तुंना विकण्यासाठी महिलांची पात्रता, क्षमता व व्यक्तिमत्वाचा पुरेपूर वापर करत आहेत. बाजारात अनेक वस्तूंची विक्री करण्यासाठी ग्राहकांना आकर्षित करणारे एक माध्यम म्हणून स्त्रिकडे पाहिले जाते. भारतात स्त्री कुटूंबाचा केंद्रबिंदू आहे. महिलांच्या स्थितीतील बदलांसोबत कौटुंबिक व्यवस्थेतही बदल झाले. जागतिकीकरणाच्या नकारात्मक प्रभावाने कुटूंबात व्यक्तिवादी प्रवृत्ती वाढत आहे. पुरुष व महिलांच्या संबंधाना विकृत स्वरुप प्राप्त होत आहे. या सर्वांत महिलांची सामाजिक व कौटुंबिक स्थिती अधिक कमकुवत झाली.

## जागतिकीकरणाचा दलितांवरील प्रभाव

ऐतिहासिकदृष्ट्या अनादी काळापासून शोषित, दमनग्रस्त आणि सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीयदृष्ट्या मागासलेल्या सर्व भारतीय समाजाचा समावेश दलित वर्गात होतो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रभाव दलितांवरही पडला. जागतिकीकरणामुळे रोजगारांच्या संधीत वाढ झाली ज्याचा फायदा दलितांना झाला. परंतू ज्या देशात सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रणालींवर उच्चवर्णीयांचे वर्चस्व आहे. वर्णव्यवस्थेतून जातिव्यवस्थेचा होणाऱ्या उदयाचे स्वरुप शोषणदायी आहे. तेथे दलितांच्या कल्याणाची चर्चा स्वप्नाळू व आदर्शवत आहे. जागतिकीकरणामुळे



Scanned by CamScanner

AJANTA - ISSN - 2277-5730 - IMPACT FACTOR - 3.378 (www.sjifactor.com)

दलित व वंचित वर्ग मुख्यप्रवाहाशी जोडले गेले. त्यांच्यात एकप्रकारे सामाजिक ऐक्याची भावना निर्माण झाली. आऊटसोर्सिंग, बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे रोजगारच्या संधित अधिक वाढ झाली. या संधीचा फायदा घेवून जीवन जगणाऱ्या दलित वर्गात सामाजिक समरसतेचे वातावरण निर्माण झाले.

परंतु वास्तविक तथ्य वेगळे जाणवते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने रोजगाराच्या संधीत वाढ झाली. परंतु दलित शैक्षणिक मागासलेपणामुळे त्याचा फायदा घेवू शकत नाही. तर दलित वर्गातील शैक्षणिक दृष्ट्या प्रगत लोकांना रोजगार मिळत आहेत. परंतू ते याही ठिकाणी भेदभावाचे शिकार बनत आहेत. कारण भारतीय समाजात आजही जाति-व्यवस्थेचे प्रस्थ अधिक मजबुत आहे. जागतिकीकरणाची संरचना व प्रक्रिया दलितांच्या स्थितित सुधारणेची मागणी करते परंतू व्यवहार त्यांच्या विरोधात आहे. कारण हे युग योग्यतेच्या उत्तरदायित्वाचे आहे. ज्यात प्राचीन काळापासून शोषित आणि त्रासग्रस्त दलितांना कोणतेच स्थान नाही. जागतिकीकरणाच्या प्रक्रिये अंतर्गत जी विषमतेची आर्थिक परिस्थिती निर्माण होत आहे. त्याचा लोकांच्या जीवनावर अधिक प्रभाव पडला. वास्तवतेत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे फलित लोकांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय, सांस्कृतिक परिवेशाच्या विस्थापनात होत आहे. अशा प्रकारच्या बदलांपासून वाचण्यासाठी लोकांना विविध बाजूने शक्ती संचित करण्याची गरज आहे. जेणेकरुन जागतिकीकरणाच्या अनपेक्षित परिणामांना सहन करुन आपला आधार कायम टिकवता येईल. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने योग्य सक्षम आणि समर्थ लोकांना फायदे मिळाले. परंतू दलित आज ही शोषित व वंचित आहेत. दलितात बहुसंख्य भूमिहीन मजूर म्हणून जगत आहे ते आजही दारिद्र्यरेषेखाली आहेत. अशा स्थितीत दलित ही जागतिकीकरणाच्या दुष्परिणामांचा सामना करावा अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. भारतात लोककल्याणकारी धोरण, कार्यक्रम राबवले जातात. ज्यात आरक्षणाचा समावेश केला जातो. आरक्षणाच्या साह्याने दलितांच्या असहाय्य व दिशाहीन जीवनाच्या प्रक्रियेला सुधारण्याचे प्रयत्न होत आहेत. जागतिकीकरणाची व्यवस्था राज्यांना लोककल्याणकारी धोरणे व कार्यक्रम राबवण्याची परवानगी देत नाही. ती लोकांच्या सामाजिक, आर्थिक जीवनात राज्याच्या हस्तक्षेपास कमी करते. यामुळे राज्याच्या स्वायत्ततेचा ऱ्हास होतो. खाजगी क्षेत्रात आरक्षणाच्या धोरणाचा विचार चालु आहे. उद्योग जगतात सामाजिक दायित्वावर भर दिला जातो. तरीही गरीब आणि दलितांचे कल्याण होईल ही बाब शंकास्पद आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत दलितांच्या कल्याणाऐवजी नुकसान अधिक होत आहे. कारण ते वर्तमान बाजाराभिमुख स्पर्धेत टिकू शकत नाहीत. दलित पात्रता, क्षमता व शिक्षणाच्या अभावाने संधी पर्यंत पोहचू शकत नाही.

### जागतिकीकरणाचा कामगारांवर परिणाम

जागतिकीकरणाचा जगातील विविध सामाजिक समूह व वर्गावर गंभीर प्रभाव पडत आहे. विशेषत: कामगारांना या प्रक्रियेने अधिक दयनीय बनवले. जगातील देश मोठ्या प्रमाणात आर्थिक घटकांच एकीकरण प्रक्रियेत गुंतले आहेत. त्यामुळे कामगारांची सुरक्षा, संरक्षण व त्यांच्या कल्याणाचे व्यापक संरचनेत बदल होत आहे. ते उद्योगपती व भांडवलदारांच्या अहिच्या अधिन झाले. कामगार कायदा महत्वहीन बनला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने कामगारांना असहाय्य बनवले.

कामगारांचे हित, आरोग्य व सुरक्षेची शाश्वती मिळावी म्हणून कामगार कायद्याची निर्मिती केली. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने या संदर्भाने कामगारांसाठी कार्यप्रणाली बनवण्यावर भर दिला परंतु जागतिकीकरणाची संरचना व प्रक्रिया अशी आहे की, त्याचा श्रमिक व श्रमिक युगावर अधिक वाईट प्रभाव पडला. कार्य व उत्पादनावर आधारित बाजाराभिमूख प्रवृत्तींनी जागतिक स्तरावर विषमता, बेरोजगारी व असुरक्षिततेच्या भावनेत वाढ केली. राज्यसंस्थेला अधिकारहीन बनवले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने कामगार प्रति पहिल्या टप्प्यात अधिक नुकसान केले. या नुकसानाबाबत विकसित व विकसनशील देशाच्या कामगार व कामगार संघटनांनी अधिक लक्ष केंद्रीत केले. विकसित देशात याचा संबंध आऊटसोर्सिंग व भांडवलाच्या स्थानांतरणाशी आहे. बेरोजगारातील वाढीशिवाय सामाजिक विषमतेच्या उदयाचा धोका आहे. जे विकसनशील देशात निम्न कार्य परिस्थिती अंतर्गत निर्मित वस्तुंचा विकसित देशासोबत निर्यातीची स्थितीत उत्पन्न होवू शकतो. याशिवाय विकसित व विकसनशील देशांच्या व्यापारी स्पर्धा आणि निम्नस्तरीय कामगार स्तरामुळे वस्तुंच्या उत्पादनात घट होण्याची भिती आहे. भारतासारख्या विकसनशील देशात जागतिकीकरणामुळे उपलब्ध रोजगारात कमतरता झाली. जागतिकीकरणाची मागणीने बाजाराभिमुख शक्तींना अधिक सदृढ केले. विकसनशील समाजाच्या अर्थव्यवस्थांनी व्यापक भांडवल गुंतवणुक विशेषत: परकीय गुंतवणुकीला आकृष्ट करण्यासाठी कामगार कायद्याच्या महत्वाला कमी केले. श्रमाचे महत्व राहीले



Scanned by CamScanner

नाही. ते मनमानेल शक्ती व अटींच्या अधीन गेले. रोजगार सुरक्षितता व सामाजिक सुरक्षिततेच्या तथ्याकडे डोळेझाक करण्यात आली. रोजगारावरील जागतिकीकरणाच्या प्रत्यक्ष प्रभावाने रोजगार निर्मिती व रोजगाराच्या संधी वाढीच्या आश्वासनाची पोलखोल केली. रोजगारात वाढ फक्त अकृषी क्षेत्र व असंगठीत क्षेत्रात झाली. ज्यास वर्तमानात काहीच भविष्य नाही. अशा क्षेत्रात कामगाराच्या सामाजिक सुरक्षिततेची व्यवस्था नाही तर मानवीय वातावरणास तयार करण्यावर भर दिला जात नाही.

## जागतिकीकरणाचा शेती व शेतकऱ्यावरील प्रभाव

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा शेतकऱ्याच्या जीवनावर अधिक प्रभाव पडला. भारतासारख्या विकसनशील देशात शेतकऱ्यांची जीवनशैली व शेती करण्याच्या पध्दतीत बदल केला. जागतिकीकरणाच्या प्रक्रिया व उत्पादन आणि शेतकऱ्यांची इच्छा व आकांक्षातील समन्वयासमोर आव्हान निर्माण झाले. भारतासारख्या विकसनशील देशात शेती शेतकऱ्यांसाठी जीवन जगण्याचे साधन नसून सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक समृध्दी व स्वामित्वाची भावना निर्माण करणारी आहे. भारतात शेतकऱ्यांचा जमीनीशी संबंध आईचा मुलाशी जसा असतो. त्याप्रमाणे आहे शेती करण्याच्या पध्दतीची निवड ते स्वतः करतात. कोणते पीक घ्यावे ते स्वतः ठरवतात. त्यांचे व त्यांच्या कुटूंबाचे संपूर्ण जीवन शेती व शेतीशी संबंधित असते. या संदर्भात जागतिकीकरणाच्या प्रभावाचे विश्लेषण होणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाचा मुख्य उद्देश्य जगातील सर्व देशांच्या सामाजिक-आर्थिक व राजकीय-सांस्कृतिक एकीकरणाशी आहे. अशात विकसनशील देशातील शेतकऱ्यांची शेतीपासून दुर जाण्याची भावना नष्ट होत नाही. तर ते स्वत:स वैश्विक खेड्याच्या प्रक्रियेचा भाग मानत नाहीत.

जागतिकीकरणाचा कृषिक्षेत्रावर प्रभाव शेतीविषयक प्रक्रिया व उत्पादनाच्या व्यापारिकरणाबाबत जाणवतो. आज बाजारु शक्तींचे महत्व वाढले आहे. त्यामुळे शेती क्षेत्रास मार्केटच्या गरजेनूसार आवश्यक वस्तूंचे उत्पादन करावे लागत आहे. उत्तम सेवा, उत्तम वस्तू स्वस्त प्रमाणात उपलब्ध करण्याच्या जागतिकीकरण आणि बाजाराच्या मोहिमेचा प्रभाव अप्रत्यक्षरित्या शेती क्षेत्रावर पडत आहे. व्यावसायिक वस्तू व नगदी पिकाच्या उत्पादनावर भर देण्यात आला. ज्यामुळे अन्न-धान्याच्या व भूकबळीच्या समस्या निर्माण होतात. शेतीच्या नव्या तंत्रज्ञान व शास्त्रीय उपकरणांच्या विकासामुळे शेतकऱ्यात विषमता वाढली. कारण सर्व शेतकरी विकसित, प्रगत, शास्त्रीय व तंत्रज्ञान विकत घेण्यास समर्थ नसतात. त्यामुळे गरीब व श्रीमंत शेतकऱ्यांतील अंतर वाढत जाते. भारतात सिंगुर, नंदीग्राम येथील घटनांकडे जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून पाहिले जाते. अर्थव्यवस्थेच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रात तणावाच्या नकारात्मक प्रभाव स्पष्ट रुपाने शेतकऱ्यांवर पडत आहे. जागतिकीकरणाच्या प्रगतीस टिकवण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्राची (SEZ) आवश्यकता आहे. परंतु यामुळे शेतकऱ्यांसमोर भूमिहीन होण्याचे संकट निर्माण होते. उदा : सिंगुर व नंदीग्राम. जागतिकीकरणाच्या युगात विशेष आर्थिक क्षेत्राच्या निर्मितीसाठी विशाल जमीनीची आवश्यकता असते. त्यामुळे शासनास भूमि अधिग्रहणाचे धोरण बनवावे लागते. परंतू याबाबत शेतकऱ्यात असंतोष आहे. याबाबत संघर्ष व वादविवाद होत आहे. अशा स्थितीत शेतकरी आणि उद्योगपती दोघांचेही हित साध्य होत नाही. पश्चिम बंगालच्या सिंगूर जिल्ह्यात टाटाला आपल्या नॅनो कार योजनेचा प्रकल्प हटवावा लागला. कारण तेथे शेतकऱ्यांनी त्याविरुध्द आंदोलन केले. जागतिकीकरणास मजबूत आधार मिळावा म्हणून कृषिगत भूमिच्या अधिग्रहणाचा प्रयत्न केला जातो. त्याबदल्यात त्यांना आर्थिक मदत केली जाते. बरेच शेतकरी त्याचा विरोध करतात. आज अनेक राज्यांनी जलद आर्थिक विकास व्हावा म्हणून मोठ-मोठ्या उद्योगपती व भांडवलवाद्यांना आपल्या राज्यात आमंत्रित केले. यामुळे शेतकऱ्यात भितीचे वातावरण उत्पन्न झाले. राज्यशासन शेतकऱ्यांना जमिनी सोडण्याच्या बदल्यात अधिक धन देण्याचे प्रलोभन देत आहेत. अशा स्थितीत शेतकरी थोड्याशा पैशासह आपली शेती सोडून विस्थापिताप्रमाणे दुसरीकडे जावून जीवन जगत आहे. रोजगाराचे साधन शोधत आहे.

याशिवाय आदिवासी, बालके, वृध्द, अपंग आणि असंघटीत क्षेत्रातील कमकुवत लोकांवर जागतिकीकरणाचे नकारात्मक परिणाम अधिक जाणवत आहेत. त्यामुळे हा वर्ग संधी मिळेल तेथे जागतिकीकरणाच्या विरोधात आंदोलने करत आहे. या आंदोलनाला चिरडून टाकण्याचा प्रयत्न जागतिकीकरणाचे फायदे घेणाऱ्या वर्गाकडून केला जातो. जागतिकीकरण ही प्रक्रिया वर्तमानात समाजातील काही विशिष्ट लोकांच्या हितसंबंधाची जोपासना करणारी जरी असली तरी त्यात गुणवत्ता व क्षमता असणाऱ्यांना संधी आहे.



Scanned by CamScanner

## निष्कर्ष

जागतिकीकरणाचा विचार आधुनिक युगातील एक सत्य आहे. ज्याने जगातील सर्व देशाच्या सामाजिक-आर्थिक आणि राजकीय, सांस्कृतिक जीवनाच्या सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही पध्दतीना गंभीर दृष्ट्या प्रभावित केले. 1990 च्या दरम्यान सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर जगात उदारमतवादी भांडवलवादी मूल्यांचा विजय झाला. परिणामतः भांडवलवादी व्यवस्थेने संपूर्ण जगात आपले पाय पसरवण्यास प्रारंभ केला. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास व माहितीच्या क्रांतीने उदारीकरण व जागतिकीकरणाच्या संकल्पनेचा विकास याच अंगाने केला. त्याने आर्थिक समृध्दि, समग्र विकास जागतिक खेडे या माध्यमातून जगातील अन्य देशांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक जीवन प्रणालीच्या पुनर्निमीतीवर भर दिला. जगातील आर्थिक एकीकरणासोबतच जागतिकीकरणाने त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय एकीकरणावर भर दिला. अशा स्थितीत त्याने समाजातील सर्व वर्गाला प्रभावित केले. लोकांच्या जीवनावर जागतिकीकरणाचे सकारात्मक व नकारात्मक दोन्ही प्रकारचे प्रभाव जाणवतात. जागतिकीकरणामुळे समाजातील एका वर्गाला अधिक फायदा झाला. जो शिक्षित, क्षमता व सामर्थ्यवान आहे. तर दूसरीकडे समाजातील शोषित, पीडित, वंचित, दीन, मागास, लोकांवर त्याचा नकारात्मक प्रभाव पडला. कारण त्याच्या मुलभूत स्थितीत कांहीच व्यापक सुधारणा झाली नाही. उलट या प्रक्रियेने त्यांचे अधिक नुकसान झाले. त्यामुळेच जगातील अनेक भागात जागतिकीकरणास विरोध करणारे घटक, वर्ग, समूह आवाज उठवतात, आंदोलन व निदर्शने करतात.

## संदर्भ ग्रंथ

1) जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय - गजानन खातू - अक्षर प्रकाशन - 2001.
2) जागतिकीकरण की नवी गुलामगिरी - नीरज - लोकायत - 2002.
3) आंतरराष्ट्रीय संबंध, डॉ.शैलेंद्र देवळाणकर, विद्याबुक्स पब्लिकेशर्स, औरंगाबाद.
4) सामाजिक न्याय और मानवाधिकार-डॉ.कृष्णकुमार शर्मा, अर्जून पब्लिशींग हाऊस, नई दिल्ली-2012.

Scanned by CamScanner